**Lokasatta 08.04.20**



## विनाकारण फिरणाऱ्यांना चाप; संचारबंदीत ७ हजार वाहने जप्त

### टाळेबंदीनंतर वाहने परत

**Lokmat 18.04.20**

## रविवारी १ हजार १२३ वाहने केली जप्त

### संचारबंदीचे उल्लंघन : ६४२ जणांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लॉकडाऊनच्या काळात कायद्याचे पालन करावेच लागेल; अन्यथा पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. पुणेकरांकडून सातत्याने कायद्याचे उल्लंघन होत असून पोलिसांनी अशा बेशिस्तपणे वागणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उभारला आहे. रविवारी विनाकारण फिरणाऱ्या १ हजार १२३ वाहनांवर कारवाई करून ती जप्त करण्यात आली आहेत. तसेच संचारबंदीच्या नियमांचा भंग केल्याप्रकरणी ६४२ जणांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

गेल्या काही दिवसांपासून बेजबाबदारपणाने वाहतूक तसेच बाहेर पडणाऱ्या नागरिकांवर पोलिसांनी कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मॉर्निंग वॉकच्या निमित्ताने बाहेर पडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, पोलिसांनी त्यांना कायद्याच्या भाषेत उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. रविवारीदेखील मॉर्निंग वॉकला बाहेर पडणाऱ्या ३२२ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. तर ३०५ नागरिकांवर विनामास्कशिवाय फिरत असल्यामुळे त्यांना कारवाईला सामोरे जावे लागले आहे. याशिवाय पोलिसांच्या आदेशाचे पालन न करता सरकारी कामात अडथळा आणणाऱ्या ११९९ जणांना पोलिसांनी नोटिसा दिल्या आहेत. सातत्याने शिस्त पाळण्याचे आवाहन करूनदेखील नागरिक त्याकडे दुर्लक्ष करत असतील तर त्यांना जाणीव करून देण्यासाठी याप्रकारे कारवाई करावी लागेल, असे पोलीस प्रशासनाकडून सांगितले आहे.



विश्रांतवाडी परिसरात जप्त करण्यात आलेली वाहने.

**Lokmat 28.04.20**

## गोखलेनगरमध्ये भाजी मंडईवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : एका बाजूला गेली दोन वर्षे सुरु असलेले भाजी मंडईचे काम पूर्ण न झाल्याने हजारो नागरिकांसाठी डझनभर भाजीविक्रेते, त्याचवेळी खरेदीसाठी केवळ दोन तास यामुळे गर्दी होत असल्याने सोमवारी महापालिका अतिक्रमण विभाग व पोलिसांनी सकाळी १० वाजताच सर्व भाजीविक्रेत्यांचा माल जप्त करण्याची कारवाई केली. यामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला होता. त्याचवेळी गोखलेनगर, जनवाडी, वडारवाडी भागांत राजरोसपणे गावठी दारूची विक्री होत असून, त्याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत.

जनवाडी येथील अरुण कदम चौकात गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याच्या कडेला भाजीविक्रेते बसतात. तेथील जुनी भाजी मंडई पाडली असून तिचे नूतनीकरण गेले दोन वर्षे रखडलेले आहे. त्यामुळे भाजी विक्रेत्यांना रस्त्यावर बसण्याशिवाय पर्याय नाही. या भागातील गोखलेनगर, जनवाडी, जनता वसाहत व परिसरातील नागरिक भाजीसाठी या विक्रेत्यांवर अवलंबून आहेत. त्यामुळे तेथे सकाळच्या वेळी मोठी गर्दी होत असते. त्यात फिजिकल डिस्टन्सिंग पाळले जात नाही. त्यामुळे पोलीस वारंवार कारवाई करत आहे. सोमवारी सकाळीच महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे अधिकारी दोन ट्रक घेऊन पोलीस फौजफाट्यासह येथे हजर झाले. त्यांनी भाजीविक्रेते विक्रीसाठी माल लावत असतानाच त्यांचा माल उचलून गाडीत टाकण्यास सुरुवात केली. त्यावरुन अनेक महिलांनी त्यांना अडवून गोंधळ घालण्यास सुरुवात केली. आम्ही रीतसर दिलेल्या वेळेत भाजीविक्री करत असताना तुम्ही कारवाई का करता, अशी विचारणा केली. त्यावर महापालिका अधिकाऱ्यांनी तुमच्याकडे परवाना नसल्याचे सांगत त्यांच्यावर कारवाई केली. गावठी दारुवाल्यांना पकडत नाही, आमच्याच मागे का लागता, असे विचारत काही महिलांनी पोलिसांना कारवाई करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला.

**Lokmat 16.04.20**

# रिकामटेकड्यांना मिळाली उठाबशांची शिक्षा

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संचारबंदी लागू करण्यात आल्यानंतरही काही तरुण विनाकारण दुचाकीवर भटकत असल्याचे दिसून येत आहे. अशाच काही तरुणांना घराबाहेर पडण्याचे योग्य कारण न देता आल्याने पोलिसांनी चांगलेच खडसावले. या तरुणांना उठाबशा काढायला लावत चुकीची जाणीव करून दिली.

संचारबंदीच्या काळात नागरिकांना जीवनावश्यक वस्तू खरेदी करता याव्यात याकरिता दोन दोन तासांची सूट देण्यात आली आहे. परंतु नागरिक शासनाच्या या आदेशाचाही गैरफायदा घेत असल्याचे दिसत आहे. पेट्रोल पंपावरही फक्त अत्यावश्यक सेवा असलेल्या व्यक्तींनाच पेट्रोल दिले जात आहे. असे असतानाही अनेक तरुण दुचाकींवर विनाकारण इतरत्र भटकत असल्याचे दिसत आहे.

शहरात पोलिसांनी कलम १४४ ची कडक अंमलबजावणी सुरु केली आहे. जागोजाग नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जात आहे. वाहनचालक कोणत्या कारणासाठी बाहेर पडलेत, त्यांच्याकडे पोलिसांचा ऑनलाईन परवाना आहे का याची शहानिशा केली जात आहे. ज्यांच्याकडे परवाना नाही किंवा विनाकारण घराबाहेर पडले आहेत अशा वाहनचालकांवर कलम १४४ आणि १८८ नुसार कारवाई केली जात आहे. दत्तवाडी पोलिसांनी सातारा रस्त्यावर नाकाबंदी केली होती.

## Lokmat 21.04.20

**पोलिसांच्या अंगावर थुंकण्याचा प्रकार : शेल्टरमधून पळून जाण्याचा केला प्रयत्न**

# ‘त्या’ला पोलिसी खाक्या दाखवून आणले जागेवर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : [illegible]

**मुझे बिडी चाहिए... : नजर चुकवून काढला पळ**

[illegible]

## Mata 11.04.20

# विनाकारण फिरल्यास फौजदारी कारवाई

**बेशिस्तीमुळे पोलिसांची कडक पावले**

म. टा प्रतिनिधी, पुणे

करोनाच्या रुग्णसंख्येत होत असलेली वाढ लक्षात घेऊन त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे. नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहन वारंवार करूनदेखील शहरातील अनेक भागांत विनाकारण नागरिक रस्त्यावर फिरत असल्याने, आता कडक पावले उचलून या नागरिकांवर गुन्हे दाखल करण्याचा विचार पोलिसांनी सुरू केला आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून केंद्र सरकारने लॉकडाउन जाहीर केला आहे; तर पोलिसांनी संचारबंदी लागू केली आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष करत अनेक नागरिक बेजबाबदारपणे घराबाहेर पडत आपल्याबरोबरच इतरांचाही जीव धोक्यात घालत आहेत. त्यामुळे येत्या १४ एप्रिलपर्यंत बाहेर पडण्यास किंवा वाहतुकीस मज्जाव केलेल्या क्षेत्रात कोणी व्यक्ती आढळल्यास त्याच्यावर फौजदारी कारवाई करण्याच्या सूचना वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या आहेत. गृह मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी नियम तोडणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याची तयारी पोलिसांनी केली आहे. फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) आणि (३) नुसार ही कारवाई केली जाणार आहे.

शहरात निर्बंध घालण्यात आलेल्या भागात फिरताना आढळणाऱ्या व्यक्तीवर संचारबंदीचे उल्लंघन केल्याचा गुन्हा दाखल होणार आहे. शहरातील खडक पोलिस स्टेशन, फरासखाना पोलिस स्टेशन, स्वारगेट आणि कोंढवा पोलिस स्टेशन हद्दीतील सर्व परिसर ‘सील’ करण्यात आला आहे. या परिसरात करोनाचे पॉझिटिव्ह रुग्ण सापडल्याने या भागात कर्फ्यू लावण्यात आला आहे.

जीवनावश्यक वस्तू व सेवा पुरवणाऱ्या केंद्रांच्या ठिकाणी करोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी गर्दी टाळावी त्यासाठी आवश्यक सामाजिक अंतराचे भान ठेवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. कर्फ्यू लावण्यात आलेल्या भागातील बँका बंद ठेवण्यात आल्य असून नागरिकांच्या सेवेसाठी केवळ एटीएम केंद्रे सुरू ठेवण्यात आली आहेत.



शनिवारवाडा परिसरात रस्ते बंद केलेले असून तरीही काही वाहने रस्त्यांवर दिसत होती.

**दोन तासांत खरेदीसाठी गर्दी**

प्रतिबंधित भागातील जीवनावश्यक वस्तू व सेवा (दूध, दुग्धजन्य पदार्थ, किराणा माल, भाजीपाला) याची विक्री करणारी दुकाने ही दिवसभरात केवळ दोन तास सुरू ठेवण्याचे बंधन पोलिसांनी घातले आहे. त्यामुळे या वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र काही भागात आहे. दिवसभरात सकाळी सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत ग्राहकांना वस्तू घेण्यासाठी दुकाने सुरू असल्याने आवश्यक वस्तू घ्यावयाची झाल्यास दुसऱ्या दिवशीच जावे लागेल, या भावनेतून अनेक नागरिक दुकानांमध्ये गर्दी करत आहे. या वेळेच्या बंधनामुळे काही दुकानबाहेर नागरिकांच्या रांगादेखील लागत आहेत.

## Prabhat 06.04.20

# छतावर जमणाऱ्यांविरोधात ड्रोनद्वारे कारवाई

पुणे, दि. ५ - संचारबंदी काळात शहराच्या मध्यभागातील इमारतींच्या छतावर जमणाऱ्यांविरोधात पोलिसांनी ड्रोनद्वारे कारवाई करण्यास सुरुवात केली. पोलिसांच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल होणार आहेत.

नाना, भवानी पेठ, रास्ता पेठ परिसरातील सोसायट्यांच्या छतावर नागरिक जमा होत आहेत. करोनामुळे नागरिकांनी सामाजिक अंतर राखावे तसेच शक्यतो घरातून बाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे. करोनाचा संसर्गाला अटकाव घालण्यासाठी नागरिकांनी शक्यतो गर्दी करू नये, असे आवाहन केले असताना नाना पेठ, भवानी पेठ, रास्ता पेठ भागांतील सोसायट्यांच्या छतावर नागरिक जमा होत असल्याचे समर्थ पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे छतावर जमा होऊन विनाकारण आरडाओरडा करणाऱ्या नागरिकांविरोधात कारवाई करण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करण्यास सुरुवात झाली आहे, असे समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम यांनी सांगितले.

## Lokmat 27.04.20



वारजे भागात विनाकारण रस्त्यांवर फिरणारांना कवायत करावयास लावण्यात आली.

# मॉर्निंग वॉक करणारांना वारजे पोलिसांचा दणका


लोकमत न्यूज नेटवर्क

कर्वेनगर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन असतानाही खोटी कारणे सांगून बाहेर पडण्याचे सोंग अनेक जण करत असतात. वारजेमधील सहायक पोलीस निरीक्षक नितीन बोधे यांनी या विनकामाचे फिरणाऱ्यांवर धडाकेबाज कारवाई सुरु केली आहे. मॉर्निंग वॉक व विनाकारण बाहेर फिरणाऱ्यांना कवायत करायला लावली. तसेच अनेकांना सज्जड दम दिला.

काहींवर दंडात्मक कारवाई केली. कारवाई केलेल्यांमध्ये वारजे परिसरात हॉस्पिटल चालवणारे डॉक्टरही होते. अनेक ज्येष्ठ नागरिकांना समज देऊन सोडून देण्यात आले. ज्येष्ठ महिलांना पोलिसांनी हात जोडून बाहेर न फिरण्याचा सल्ला दिला.

## Prabhat 16.04.20

**महात्मा फुले मंडई बंदच...**





पुणे : शहराच्या मध्यवर्ती भागाला फळे आणि भाजीपाल्याचा पुरवठा करणारी महात्मा फुले मंडई बुधवारपासून सुरू होणार होती. मात्र, पोलिसांनी परवानगी नाकारल्याने ती बंदच ठेवण्यात आली आहे.

# मद्यविक्री करणाऱ्यांवर तीन ठिकाणी कारवाई

पुणे, दि. १५ - [illegible]

**Lokmat 24.04.20**

# जुगार खेळणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

हडपसर : लॉकडाऊन असतानादेखील तीनपत्ती जुगार खेळणाऱ्यांवर हडपसर पोलिसांनी छापा टाकला. या वेळी सहा जणांना पकडण्यात आले आहे. तसेच, साडेसहा हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई मंगळवारी करण्यात आली आहे.

याप्रकरणी रामदास बाबासाहेब कांबळे, संजय शिवाजी सूर्यवंशी, ज्ञानेश्वर राजेंद्र कामठे, विनायक यशवंत अलाहाबादे, नारायण गणा ढावरे, यशवंत अरुण बनसोडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोरोनामुळे शहरात लॉकडाऊन सुरु आहे. नागरिकांना बाहेर पडण्यास मनाई केली आहे. एकत्र जमण्यासदेखील बंदी आहे. परंतु, संचारबंदीच्या नियमांचे उल्लंघन करून हडपसरमध्ये काहीजण जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तीनपत्ती जुगार खेळताना रंगेहाथ पकडले.

**Mata 04.04.20**

# गच्चीवर जमणाऱ्यांविरोधात ड्रोनद्वारे कारवाई

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहरात संचारबंदी लागू करण्यात आली असताना अनेकजण इमारतींच्या गच्चीवर एकत्र जमत असल्याचे दिसून आले. त्यामुळे आता गच्चीवर एकत्र जमणाऱ्यांच्या विरोधात पोलिसांनी ड्रोनद्वारे कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. अशा व्यक्तींचे फोटो ड्रोनद्वारे काढून त्यांच्यावर आदेशांचे उल्लंघन केल्याचे गुन्हे दाखल केले जाणार आहे.

शहरातील मध्यभागाच्या दाट वस्तीच्या नाना, भवानी पेठ, रास्ता पेठ परिसरातील सोसायटीच्या छतावर नागरिक जमा होत आहेत. 'करोना'मुळे नागरिकांनी सामाजिक अंतर राखावे; तसेच घरातून बाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. 'करोना'च्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी नागरिकांनी शक्यतो गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तरीही नाना पेठ, भवानी पेठ, रास्ता पेठ भागातील सोसायट्यांच्या छतावर नागरिक जमा होत असल्याचे समर्थ पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे छतावर जमा होऊन विनाकारण आरडाओरडा करणाऱ्या नागरिकांविरोधात कारवाई करण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी माइकद्वारे नागरिकांना सूचना दिल्या जात आहेत. गच्चीवर एकत्र झाल्यास कारवाई केली जाईल, असे सांगितले जात आहे.

> 'करोना'च्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी पोलिसांनी उपाययोजना हाती घेतल्या आहेत. सोसायटीच्या छतावर; तसेच पार्किंगमध्ये जमा होणाऱ्या नागरिकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवण्यात येत आहे. जमावबंदीच्या आदेशाचा भंग करणाऱ्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात येणार आहे.
>
> – बाळकृष्ण कदम, वरिष्ठ निरीक्षक, समर्थ पोलिस ठाणे

**Mata 23.04.20**



दिगंबर माने

हडपसर, गाडीतळ चौक येथे निष्कारण रस्त्यावर वाहने घेऊन फिरणाऱ्यांवर कारवाई करून ६७ वाहने जप्त करण्यात आली.

# हडपसर पोलिसांची ६७ वाहनांवर कारवाई

म. टा. प्रतिनिधी, हडपसर

निष्कारण घराबाहेर फिरणाऱ्या वाहनांवर हडपसर पोलिस स्टेशन हद्दीमध्ये बुधवारी केलेल्या कारवाईत ६७ दुचाकी आणि चारचाकी वाहने ताब्यात घेण्यात आली. जप्त केलेल्या सर्व वाहनचालकांना गाडीतळ बस स्थानक चौकामध्ये उभे करून त्यांची कानउघडणी करण्यात आल्याचे हडपसर पोलिस ठाण्याचे गुन्हे शाखेचे निरीक्षक हमराज कुंभार यांनी सांगितले.

पुण्यात दिवसेंदिवस करोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. निष्कारण घराबाहेर पडू नका, असे आवाहन पोलिसांकडून अनेकदा करण्यात येत असले, तरीही काही नागरिक घराबाहेर पडत आहेत. त्यामुळे पोलिसांनी कारवाई तीव्र केली आहे. विनाकारण बाहेर फिरणाऱ्या ६७ नागरिकांना हडपसर पोलिसांनी बुधवारी नोटिसा दिल्या आहेत.